जा.क्र./नसका/स्थायी/CR- 82 /2014.
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः- 9 /12/2014

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**स्थायी समितीच्या सभेची सूचना**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम** 1949 **चे अनुसूची ड चे प्रकरण** -2 **मधील नियम क्र.**3 (अ) **अन्वये**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र 3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **दि. 11.12.2014. रोजी दुपारी 12.00 वा.** नांवाशमनपा स्थायी समिती सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

(मा.सभापती यांचे आदेशान्वये)

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

प्रति,
**श्री/श्रीमती** ________________________________
सदस्य / सदस्या स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**कार्यक्रम पत्रिका**

**विषय क्र.1**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हध्दित प्रभाग क्रं 3(ब) मध्ये आसना बायपास येथे एक सेंट्रल पोल उभारुन त्यावर तिन सार्वजनिक पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहेत. सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम(विद्युत विभागाच्या) डी.एस.आर. 2011-12 नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर श्री नांदेड इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी रु.46877/- (अक्षरी रु.शेचाळिस हजार आठशे सत्यात्तर फक्त ) एवढा खर्च झालेला आहे.

करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनूसूची (ड) प्रकरण (5) कलम (2) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर

**विषय क्र.2**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हध्दित झोन क्रं 2 अंतर्गत प्रभाग क्रं 14 मध्ये विष्णू नगर भागात 15 नग एनर्जी एफिशियंट 4x24 व्हॅट टी-5 सार्वजनिक पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहेत.सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम(विद्युत विभागाच्या) डी.एस.आर. 2011-12 नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर श्री नांदेड इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी रु.90210/- (अक्षरी रु.नव्वद हजार दोनशे दहा फक्त ) एवढा खर्च झालेला आहे.

करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनूसूची (ड) प्रकरण (5) कलम (2) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर

**विषय 3**

दि.17 सप्टेबर 2013 रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्य सकाळी 8.30 वा.माता गुजरीजी विसावा उद्यानातील स्मृतीस्तंभास मानवंदना व पुष्पचक्र अर्पण कार्यक्रम व सकाळी 9.05 वा.श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम करण्यात आला होता त्या अनुषंगाने पावसाचे दिवस असल्यामूळे वॉटरप्रुफ मंडप,फायबर चेअर, बॅरोगेटींग ग्रीन मेट ,टेबल ई.साहित्य पुरवठा करण्यासाठी श्री सहयोग सेवा ,जूना मोंढा यांना आदेशित करण्यात आले होते .सदरील कामासाठी रु.1.24.305/- एवढा खर्च झालेला असून त्यास आदेश क्र. नावाशमनपा/क्षेका2/740/2014 दि.30.8.2014 अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**विषय 4**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.5 अंतर्गत मुलभुत सोयी सुविधासाठी विशेष अनुदाना अंतर्गत शामनगर हॉस्पीटल ते बजाज गॅरेज पर्यत उपलब्ध्द निधीच्या अनुषंगाने एकूण 323.00 मि.लांबीच्या रस्त्याचे सिमेंटी करण्याचे काम प्रस्तावित करण्यात आले होते व सदरचे काम पुर्ण करुन धेण्यात आले आहे. निधी अभावी सदर रस्त्याच्या एकूण लांबी पैकी 33.00 मि.रस्त्याचे काम शिल्लक राहत होते प्रत्यक्ष स्थळावर नागरीकांनी केलेल्यामागणी नुसार व स.सदसयाचे विनिंती नूसार पुर्वीचे कंत्राटदार मे प्रविण कन्स्ट्रक्शन याचेकडून करुन घेण्यात आले त्यासाठी रु.321800/- खर्च झालेला आहे. कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे.प्रविण कन्स्ट्रक्शन नादेड याचंकडून करुन घेण्यात आले असुन त्यास झालेला खर्च रु. 321800/- यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 कलम 2 नुसार स्थायी समिती समोर सादर.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.